


RNI NO-MAHMAR/2022/90217

दैनिक जनसंचलन
निडर निर्भिड
व्यापक जनचळवळीचा प्रहरी!

संपादक : जितेंद्र कायस्थ
Email- jansanchlan@gmail.com
Mob- 9822720784




वर्ष ३ रे अंक : १७४ वा शनिवार दि २३ ऑगस्ट २०२५ पृष्ठ ८ किंमत ३ रुपये

# उपसंचालक डॉ. कमलेश भंडारी यांची अखेर उचलबांगडी...

## बुलडाणा रुग्णालयातील भ्रष्टाचार व इतर प्रकरणी निष्क्रियतेला शासनाचा चपराक!

**जनसंचलन/बुलढाणा**

बुलडाणा जिल्हा सामान्य रुग्णालयातील कोट्यवधी रुपयांच्या घोटाळ्या प्रकरणी कारवाईस टाळाटाळ करणाऱ्या अकोला मंडळाचे उपसंचालक डॉ.कमलेश रमेश भंडारी यांच्यावर अखेर शासनाचा गाजावाजा झाला आहे. शासनाने त्यांची बदली करून त्यांना सहसंचालक,आरोग्य सेवा (), मुंबई या अवनत पदावर डांबले आहे. ही बदली प्रशासकीय कारणास्तवफ्र असल्याचे आदेशात नमूद केले असले तरी खरी कारणे म्हणजे भ्रष्टाचारातील दोषींवर कारवाईस भंडारी यांनी दाखवलेली टाळाटाळ व निष्क्रियता असल्याचे प्रशासनातील सूत्र सांगतात. बुलडाणा रुग्णालयातील तत्कालीन जिल्हा शल्य चिकित्सक डॉ.नितीन तडस आणि पात्रता नसतानाही भांडार विभाग सांभाळणारा बडतर्फ भांडारपाल प्रकाश नामदेव बोथे हल्ली मुक्काम गोरक्षण परिसर अकोला यांच्यासह इतरांवर विभागीय चौकशीत गंभीर दोष सिद्ध झाले होते. मात्र, उपसंचालक भंडारी यांनी

**अन्यायग्रस्त,भ्रष्टाचार व नियमबाह्य कामाच्या विरोधात आमचा लढा असाच कायम राहील व दोषींवर जो पर्यंत कारवाई होत नाही आम्ही आमच्या बातमीपत्रातून सत्यता बाहेर आनंतच राहू**

पुढील कठोर कारवाईस टांगती तलवार लावली होती. शासनाने हे गांभीर्य ओळखत त्यांना पदावनत करत स्पष्ट संदेश दिला आहे की, भ्रष्टाचार झाकणाऱ्या अधिकारी-कर्मचाऱ्यांना शासन माफ करणार नाही. शासन आदेशात तडकाफडकी निर्देश देत भंडारींना तातडीने नवीन पदावर रुजू होण्यास भाग पाडण्यात आले आहे.रजा मंजूर न करण्याचा आदेश देत,हजर न राहिल्यास अनधिकृत अनुपस्थितीफ्र मानली जाईल, असेही शासनाने बजावले आहे. शिवाय बदली रद्द करण्यासाठी दबाव आणल्यास शिस्तभंगात्मक कारवाई होईल, असा इशाराही आदेशात देण्यात आला आहे. या निर्णयामुळे आरोग्य विभागात मोठी खळबळ




उडाली असून, वरिष्ठ अधिकाऱ्यांवर अशी श्रेणी अवनती करणे हा शासनाचा दुर्मिळ पण ठोस निर्णय असल्याचे बोलले जात आहे. बुलडाणा रुग्णालयातील घोटाळा प्रकरणी कारवाईस गती न देणाऱ्यांवर शासनाने हात उचलल्याने, वैद्यकीय प्रशासनातील इतर निष्क्रिय अधिकाऱ्यांच्या गळ्यातही आता धसका बसणार हे निश्चित झाले आहे.

अजून बरेच काही पुढील भागात...

---

# सैलानीतील थरारक खून : तात्काळ पोलिसांची कारवाई, सर्व आरोपी गजाआड!

**जनसंचलन/बुलडाणा**

जुन्या वादातून सैलानी येथे पहाटे झालेल्या थरारक खून प्रकरणाने संपूर्ण जिल्ह्यात खळबळ उडवली. इंदिरा नगर येथील ऑटोचालक शेख नफिज शेख हाफिज (३८) याचा धारदार शस्त्राने निर्दय खून करण्यात आला. बरीवाले बाबा दर्ग्याजवळील झोपडीसमोर शनिवारी, २३ ऑगस्ट रोजी पहाटे १२.४५ वाजता ही घटना घडली. तक्रारीनुसार आरोपी ॲलेक्स इनॉक उर्फ रोनी, शेख सलमान शेख अशपाक आणि वाजीद टोपी यांनी रागातून नफिजवर हल्ला चढवला. सलमानने केस पकडून धरले, वाजीदने दांड्याने पायावर वार केला, तर ॲलेक्स उर्फ रोनीने धारदार चाकूने छातीवर सलग वार



करून नफिजचा जागीच खून केला. रक्ताच्या थारोळ्यात कोसळलेल्या नफिजचा मृत्यू तात्काळ झाला. हल्ल्यानंतर आरोपी पसार झाले असले तरी, कर्तव्यदक्ष जिल्हा पोलीस अधीक्षक निलेश तांबे यांच्या मार्गदर्शनाखाली पोलिसांनी अल्पावधीतच सर्व आरोपींना बेड्या ठोकल्या. रायपूर पोलिसांच्या धडक कारवाईमुळे परिसरातील नागरिकांनी सुटकेचा नि:श्वास सोडला आहे. गुन्हा क्र.१४६/२०२५ भा.दं.सं. कलम १०३(१), ३(५) नुसार गुन्हा दाखल असून तपास सपोनी निलेश सोळंके करीत आहेत.

# २५ वर्षीय तरुणाचा विष प्राशनाने मृत्यू



**जनसंचलन/बुलढाणा**

विश्वास नगर येथील २५ वर्षीय तरुणाने दारूमध्ये विष मिसळून आत्महत्या केली. उपचारादरम्यान त्याचा जिल्हा सामान्य रुग्णालयात मृत्यू झाला. मृताचे नाव राहुल दिलीप गवई असे असून तो मोलमजुरी करून उपजीविका करीत होता. गेल्या काही दिवसांपासून तो पारिवारिक तणावाखाली होता. गुरुवारी रात्री त्याने दारूमध्ये विष टाकून प्राशन केले. कुटुंबीयांनी त्याला बुलढाणा जिल्हा सामान्य रुग्णालयात दाखल केले; मात्र उपचार सुरू असतानाच २२ ऑगस्ट रोजी सकाळी अकराच्या सुमारास त्याचा मृत्यू झाला. बुलढाणा पोलिसांनी आकस्मिक मृत्यूची नोंद केली आहे

# पोळी, पोळा अन् पोळणं...

## संपादकीय लेख

एका मराठी शाळेजवळून जाताना खालील कागद सापडला. आम्ही पूर्वीपासून खाली मान घालून चालणारे असल्याने आम्हाला असं काय काय रस्त्यावर सापडत असतं. मागच्या वेळी नागपंचमीचा फुस्सका निबंध सापडला होता. या वेळी कुणी तरी बैलपोळ्यावर निबंध लिहिलेला दिसतोय. जे त्या कागदावर सापडलं ते येणेप्रमाणे... बैलांना नैवेद्याची पुरणपोळी त्यांना खायला घालतात. बैलांना पुरणपोळी कितपत आवडते हे समजायला मार्ग नाही. त्यांना ओला चारा आवडत असावा, हे मागं ङ्कओला चारा बैल माजलेफ या कवितेच्या ओळीवरून समजलं होतं. मात्र, बैल फार माजू नयेत म्हणून त्यांना ओल्या चाऱ्याऐवजी जायफळ घातलेली गोडगोड पुरणपोळी खायला देत असतील, हे शक्य आहे. असली पुरणपोळी खाल्ल्यावर भलेभले लोक गारद होऊन बराच काळ झोपून राहतात. बैलांनादेखील या दिवशी सुट्टी असल्याने करायचं तरी काय, असा प्रश्न असतो. त्यामुळं कदाचित तेही पुरणपोळी खाऊन मस्त झोपत असतील. अर्थात, घरात निवांत झोपलेल्या पुरुषाप्रमाणेच निवांत झोपलेला बैलही कुणाला बघवत नसल्याने संध्याकाळी (चहाच्या टायमाला) त्याला ढोसून उठवतात. उठवणारे आपण स्वत: चहा पितात आणि बैलांना मिरवत घेऊन जातात. या दिवशी बैलांना विशेष सजवलं जातं. त्यांच्या अंगाला आणि शिंगांना रंग लावला जातो. त्यांच्यासाठी बाजारातून घुंगरं आणली जातात. बैलांचे मालक दुसऱ्याच (नाजूक इ.) पायांतले घुंगरू ऐकत असले, तरी बैलांना ही फॅसिलिटी नाही. त्यांना स्वत:च्याच गळ्यांतले घुंगरू ऐकावे लागतात... तर ते एक असो. बैलांना गावातून मिरवत नेतात. फारच चैन असेल तर पुढं बँड वगैरे लावला जातो. संध्याकाळी गावच्या पाटलाच्या वाड्यापुढं सगळे बैल उभे करून त्यांची पूजा केली जाते. पुन्हा मिरवत मिरवत त्यांना घरी नेलं जातं. बैल या दिवशी खूश असतात. याचे कारण वर्षातून त्यांना एवढा एकच दिवस सुट्टी मिळते... सुट्टीचा विषय आला अन् आम्हाला पुढचं वाचवेना. हुंदकाच दाटून आला. बाकी लिहिणारा मुलगा चांगला अनुभवी असावा. एकेका वर्गात दोन-दोन वर्षं ढोरमेहनत करूनच पुढच्या वर्गात जाणारा असावा. त्यामुळं त्याला बैलांविषयी अपार करुणा वाटत असावी. आमचीही भावना अगदी तशीच आहे. बैल कितीही आडदांड असला, तरी नीट बघितलं तर त्याच्या डोळ्यांत बऱ्याचदा करुण भाव दिसतात. शेवटी गायीचंच लेकरू ते! होऊन होऊन असं किती गुंड होणार, नाही का? बैलाच्या नशिबी केवळ कष्ट आणि कष्ट असतात.



त्या तुलनेत त्याच्या कामाचं फार ॲप्रिसिएशन होत नाही. उलट एखादा माणूस फार बुद्धीचं काम करत नसला, तर त्याला ङ्ककाय बैलासारखं काम करतोय?फ असं म्हणतात. वास्तविक कष्ट हे कष्ट असतात. मात्र, बैलासारखं काम या सततच्या टोमण्यांखाली बैलसमाज पुष्कळसा दबला गेला आहे. अनेकदा रस्त्यानं जाताना उसाच्या गाड्यांचा भार पेलणारे बैल बघून फार कणव दाटून येते. त्यांना तो भार पेलवत नाही, असं स्पष्ट दिसत असतं. अनेकदा त्यांच्या तोंडून फेसही येत असतो. वर गाडीमालक चाबकाचे फटके ओढत असतो. तरी अलीकडं त्या गाड्यांना लाकडी चाकांच्या धावेऐवजी टायर लावलेले असतात, हे एक बरंय. पूर्वी गावाकडं उसाच्या गुऱ्हाळातल्या बैलाकडं बघत बसण्याचा एक छंद होता. तिथल्या शेणानं सारवलेल्या जागेचा, बैलाच्या चाऱ्याचा, आले-लिंबाचा एक गोड ओलसर सुगंध तिथं दरवळत असायचा. अशा वातावरणात आपल्यासाठी गोल गोल फिरून लाकडी चरकातून रस काढून देणाऱ्या बैलाविषयी कृतज्ञभाव मनात दाटून यायचा. वय लहान असल्यानं निरागसही होतं. पुढं मोठं झाल्यावर, मानेवर खडा ठेवून, एकाच चाकोरीत फिरत काम करणाऱ्या समस्त कर्मचारीवर्गाची तुलना बैलाशी का करतात, हे लक्षात आलं. पुढं आणखी अक्कल आली, तशी आपणच ते वृषभराज आहोत, हे कळलं. मग आपल्याला त्या शृंगधारी चतुष्पादाविषयी एवढी करुणा का वाटत राहते, हाही साक्षात्कार झाला! तुम्हालाही हॅपी बैलपोळा हं!




## नगरपालिका लक्ष केव्हा देणार; विद्यार्थी व नागरिक त्रस्त



**जनसंचलन/ लोणार**

शहरातील धारातीर्थ रोड वरील मस्जिद चौकाजवळील रस्त्याची दुर्दशा झाली आहे. रस्त्यावर मोठे खड्डे पडले आहेत. चारचाकी सोडाच पायी चालणेही शक्य नाही. सध्या पावसामुळे खड्ड्यांत पाणी साचल्याने नागरिकांच्या अडचणीत भर पडली आहे. या रस्त्यावर पोलिस स्टेशन,अनेक व्यावसायिक ,शाळा, निवासी वसाहती,धार्मिक स्थळे आहेत. मात्र, रस्त्याच्या दुर्दशेमुळे दररोज हजारो नागरिकांना तोंड दाबून बुक्क्यांचा मार सहन करावा लागत आहे. शाळेसमोरच्या रस्त्यांवरही पाणी आणि खड्डेच आहेत. चिखल तुडवत विद्यार्थ्यांना शाळेत जावे लागत आहे. शहरात काही अनर्थ प्रकार होत असल्याचं ते थांबविण्याची जबाबदारी पोलिस प्रशासन ची असून त्यांना त्या ठिकाणी पोचण्यासाठी या खड्ड्यांमुळे उशीर झाले व काही मोठा अनर्थ घडला तर त्याची जबाबदारी कोणाची राहील? एकीकडे लोणार शहराच्या विकासाच्या मोठमोठ्या गप्पा करून व नागरिकांना विकासाचे स्वप्न दाखवून प्रकाशजोतात राहणाऱ्या मुख्याधिकारी तथा प्रशासक विभा वराडे यांना सांगून व निवेदन देऊन पण उपयोग होत नसल्याचे नागरिक बोलत आहे नुकतेच काही दिवसाआधी भाजपा कडून मस्जिद चौक ते बस स्टँड चौका पर्यंतची नाली दुतर्फा साफ करून मुख्यनाळी ला जोडण्यात यावी यासंबधी निवेदन देण्यात आले पण आजपर्यंत मागणीला यश आलेले नाही आहे, तरी वरिष्ठ प्रशासनाने तातडीने पावले उचलावीत, असा इशारा नागरिकांनी दिला आहे.

*The Daily News Paper Jansanchalan printed by owner, publisher and editor Jitendra Devchand Kayastha at Sarvadnya Printers Buldhana and published at Dainik Jansanchalan Office Shivshopping Complex Buldhana. Dainik Janasanchalan printers, owners and editors do not necessarily agree with the opinions published in the issue* Court. 9822720784.
(RNI NO-MAHMAR/2022/90217) Email- jansanchlan@gmail.com

दैनिक निडर निर्भिड जनसंचलन
व्यापक जनचळवळीचा प्रहरी!



# विजेच्या धक्क्याने लेकरा-बाळांसह पाच जणांचा अंत, मृतदेह नेताना रुग्णवाहिका बंद, दोर बांधून रुग्णालयापर्यंत...




**जळगाव** : जळगाव जिल्ह्यात एक धक्कादायक घटना उघडकीस आली. जळगाव जिल्ह्यातील एरंडोल तालुक्यामधील वरखेडी गावात एकाच कुटुंबातील पाच जणांचा शेतातील विजेच्या तारांचा धक्का लागून मृत्यू झाला. मृतांमध्ये आजी, पती-पत्नी, दोन मुलांचा समावेश आहे. हे सर्व मजुरीसाठी शेतात आले होते. सर्व मृत मध्य प्रदेशातील असल्याची माहिती देखील समोर आली आहे. पिकांचं प्राण्यांपासून संरक्षण व्हावं यासाठी शेतकऱ्याने कुंपण घालून त्यात वीज प्रवाह सोडला होता. शेतमालकाला पोलिसांनी ताब्यात घेतलं आहे. ही घटना आज दुपारी १२.३० वाजेच्या सुमारास घडली. धक्कादायक बाब म्हणजे या सर्वांचे मृतदेह जेव्हा रुग्णालयात नेण्यात येत होते, तेव्हा अर्ध्या रस्त्यात रुग्णवाहिका बंद पडली.जळगावमधील एरंडोल तालुक्यातील वरखेडी गावाजवळील शेतात विजेच्या धक्क्याने एकाच कुटुंबातील पाच जणांचा मृत्यू झाला. या पाच जणांमध्ये दोन लहान लेकरांचा देखील समावेश आहे. या घटनेदरम्यान एक प्रकार उघडकीस आला तो म्हणजे, पाचही जणांचे मृतदेह रुग्णवाहिकेतून जळगाव जिल्हा रुग्णालयात आणत असताना रुग्णवाहिका जळगाव शहरातील खोटे नगरजवळ अचानक बंद पडल्याचा प्रकार घडला. दुसऱ्या एका रुग्णवाहिकेच्या माध्यमातून मोठा दोर बांधून मृतदेह असलेली बंद पडलेली रुग्णवाहिका जळगावच्या जिल्हा रुग्णालयापर्यंत आणण्यात आली. जिल्हा रुग्णालयात रुग्णवाहिका पोहोचल्यानंतर मृतदेह उतरविण्यात आले. एवढ्या मोठ्या घटनेतील मृतदेह घेऊन येणारी रुग्णवाहिका बंद पडल्याच्या या प्रकारामुळे आरोग्य विभागाच्या कारभारावर प्रश्नचिन्ह उपस्थित केलं जात आहे. दरम्यान, शेतातील पिकांचे संरक्षण करण्यासाठी वन्यप्राण्यांपासून बचाव करण्याच्या उद्देशाने विजेच्या तारांचा वापर करण्यात आला होता. त्यामध्ये आलेल्या विद्युत धक्क्यामुळे दोन लहान मुले, दोन महिला आणि एक पुरुष अशा मिळून ५ व्यक्तींचा मृत्यू झाला आहे. मृतदेह पुढील कार्यवाहीसाठी व शवविच्छेदनासाठी रुग्णालयात हलविण्यात आलेले आहेत. या घटनेमध्ये शेतमालकाला देखील पोलिसांनी ताब्यात घेतलं असून त्याच्या विरोधात सदोष मनुष्यवधाचा गुन्हा दाखल करण्याची प्रक्रिया सुरू आहे.

## बनावट दस्तऐवजाद्वारे पासपोर्ट, २०१४ पासून शहरात राहणाऱ्या बांग्लादेशी नागरिकाविरोधात गुन्हा दाखल...




**नागपूर** : बांगलादेशी नागरिकाने बनावट दस्तऐवजाआधारे भारतीय पासपोर्ट बनवून नागपुरात वास्तव केल्याची खळबळजनक घटना उघडकीस आली आहे. याप्रकरणी गिट्टीखदान पोलिसांनी बांगलादेशी नागरिकाविरूद्ध गुन्हा दाखल केला आहे. जोयसन चौधरी पी. सुनील चौधरी बरूआ (वय ४१, सध्या रा. न्यू बगडगंज, लकडगंज), असे गुन्हा दाखल करण्यात आलेल्या आरोपीचे नाव आहे. जोयसन हा मूळ बांगलादेशातील जयस्तापुरा, बालखली, चिटगाव येथील रहिवासी आहे.

सेमिनरी हिल्स येथील सीजीओ कॉम्प्लेक्समधील विभागीय पासपोर्ट कार्यालयातील साहाय्यक संदीप मुन्नर यादव (वय ३५) यांनी दिलेल्या तक्रारीवरून हा गुन्हा दाखल करण्यात आला. पोलिसांकडून प्राप्त माहितीनुसार, २०११मध्ये जोयसन बांगलादेशच्या पासपोर्टवर भारतात आला. त्यानंतर तो परत गेला. २०१४मध्ये तो पुन्हा भारतात आला. त्याला बांगलादेशात परत जायचे नसल्याने तो शहरातील बगडगंज येथील धार्मिक स्थळी राहायला लागला. तेथेच तो कामही काम करू लागला. यादरम्यान भारतीय नागरिकत्व मिळविण्यासाठी त्याने प्रयत्न सुरू केले. दलालाच्या माध्यमातून त्याने तो भारतीय असल्याचे बनावट दस्तऐवज तयार केले. सोमवारी दुपारी ४ वाजताच्या सुमारास जोयसन हा पासपोर्ट कार्यालयात आला. यादव यांना तो भेटला. मी बांगलादेशचा मूळ नागरिक आहे. २०१४पासून भारतात राहतो. मी बनावट दस्तऐवज तयार केले असून मला भारतीय नागरिकत्व हवे आहे, असे म्हणत त्याने यादव यांना दोन पासपोर्ट दिले.भारतीय पासपोर्ट बघून यादव यांना धक्का बसला. त्यांनी त्याला भारतीय पासपोर्टबाबत विचारणा केली असता बनावट दस्तऐवजाद्वारे मी हे पासपोर्ट तयार केल्याचे जोयसन याने यादव यांना सांगितले. त्यानंतर जोयसन हा कार्यालयातून निघून गेला. यादव यांनी याबाबत क्षेत्रीय पासपोर्ट अधिकाऱ्यांना माहिती दिली. त्यानंतर लगेच जोयसनचा पासपोर्ट रद्द करण्यात आला. याप्रकरणी यादव यांनी दिलेल्या तक्रारीवरून गिट्टीखदान पोलिसांनी फसवणूक व पासपोर्ट अधिनियमासह विविध कलमांन्वये गुन्हा दाखल केला.

## जल,जमीन अन् आकाश, अमेरिकेला जड जातेय भारत-चीन युती, भविष्यातही धक्के बसणार?



**नवी दिल्ली:** अमेरिकेचे राष्ट्राध्यक्ष डोनाल्ड ट्रम्प यांनी आयात-निर्यात शुल्कात वाढ केल्यापासून भारत आणि चीन यांच्या संबंधात सुधारणा होत आहे. २०२० नंतर दोन्ही देश पुन्हा एकदा जवळ येत आहेत. मागील काही दिवसांत भारत आणि चीनमध्ये अनेक व्यापारी करार झाले आहेत.रेअर अर्थ मेटल, बॉर्डर ट्रेड , विमान सेवा पुन्हा सुरू करणे, असे अनेक करार झाले आहेत. भारत आणि चीनची जवळीक अमेरिकेसाठी अडचणी निर्माण करू शकते. दोन्ही देश एकमेकांशी व्यापार वाढवू शकतात. ट्रम्प यांच्या टॅरिफ धोरणामुळे भारत आणि चीन या दोन्ही देशांना अमेरिकेत व्यापार करणे कठीण झाले आहे. त्यामुळे दोन्ही देश एकमेकांच्या जवळ येत आहेत. अमेरिकेच्या टॅरिफ धोरणामुळे २०२० नंतर भारत आणि चीन अधिक जवळ आले आहेत. चीनचे परराष्ट्र मंत्री वांग यी यांनी नुकतीच भारत भेट दिली. त्यांनी भारताचे परराष्ट्र मंत्री एस. जयशंकर, राष्ट्रीय सुरक्षा सल्लागार () अजित डोभाल आणि पंतप्रधान नरेंद्र मोदी यांच्याशी चर्चा केली. या भेटीत दोन्ही देशांनी सीमेवर व्यापार पुन्हा सुरू करण्याचा निर्णय घेतला आहे. भारत आणि चीन तीन मार्ग उघडणार आहेत. त्याचबरोबर, दोन्ही देशांमध्ये लवकरच विमानसेवा देखील सुरू होणार आहे. यामुळे दोन्ही देशांमधील तणाव कमी होईल आणि संबंध सुधारण्यास मदत होईल.

# अजित पवार गटात पक्षप्रवेशाची घोषणा करताच पी.एन. पाटलांच्या लेकाने स्पष्टच सांगितले, आता लढाई..

**कोल्हापूर :** मी जरी महायुतीतील राष्ट्रवादीत प्रवेश प्रवेश करणार असलो, तरी २०२९ ला करवीर विधानसभा मतदारसंघातून विद्यमान आमदारांच्या विरोधात निवडणूक लढवणार असल्याचे स्वर्गीय माजी आमदार पी.एन. पाटील यांचे चिरंजीव राहुल पाटील यांनी स्पष्ट केले आहे. राष्ट्रवादीत प्रवेश करण्यापूर्वीच राहुल पाटील यांनी महायुतीमधील विद्यमान आमदारांच्या विरोधात बंड पुकारलं आहे. कोल्हापूरातील काँग्रेसचे स्वर्गीय माजी आमदार पी. एन. पाटील यांचे चिरंजीव आणि माजी जिल्हा परिषद अध्यक्ष राहूल पाटील लवकरच काँग्रेसला सोडचिठ्ठी देणार आहेत. पी.एन.पाटील यांच्या हजारो समर्थक आणि कार्यकर्त्यांसह राहुल पाटील २५ तारखेला राष्ट्रवादी



अजित पवार पक्षात जाहीर प्रवेश करणार आहेत. आज पत्रकार परिषद घेऊन राहुल पाटील यांनी काँग्रेस सोडण्याबाबतची भूमिका स्पष्ट केली.
पी. एन. पाटील साहेब होते तेव्हा कार्यकर्त्यांना कोणत्याही अडचणी आल्या नाहीत. मात्र त्यांच्या पश्चात आणि आपला करवीर विधानसभा मतदारसंघात पराभव झाल्यानंतर कार्यकर्त्यांना अनेक अडचणी येत आहेत. आता राजकीय समीकरणं बदलली आहेत. त्यामुळे कार्यकर्त्यांसाठी आणि त्यांच्या आग्रहाखातर काँग्रेस सोडण्याचा निर्णय आपण घेतल्याचे राहुल पाटील यांनी स्पष्ट केले.यावेळी कार्यकर्त्यांची निष्ठा पी. एन. पाटील साहेबांवर होती आणि साहेबांची निष्ठा काँग्रेसवर होती, असंही राहुल पाटील यांनी म्हटलं आहे. शिवाय करवीरमधील यापुढील निवडणुका आपण पी. एन. पाटील गट म्हणूनच लढवणार असल्याचं राहुल पाटील यांनी जाहीर केलं आहे.
याची कल्पना देखील उपमुख्यमंत्री अजित पवारांना दिल्याचं त्यांनी म्हटलं आहे.राहुल पाटील हे काँग्रेसचे दिवंगत आमदार पी. एन. पाटील यांचे चिरंजीव आहेत. शिवसेनेचे विद्यमान आमदार चंद्रदीप नरके यांच्या विरोधात त्यांनी २०२४ ची विधानसभा निवडणूक लढवली होती. मात्र आता महायुतीतील पक्षामध्ये प्रवेश करणार असलो तरी २०२९ च्या विधानसभा निवडणुकी मध्ये विद्यमान आमदारांच्या विरोधातच उभा राहणार आहे, असे विधान राष्ट्रवादी काँग्रेस पक्षामध्ये प्रवेश करणारे राहुल पाटील यांनी केलं आहे. यावेळी राहुल पाटील यांचा अगदी थोडक्या मतांनी पराभव झाला होता.
करवीर विधानसभा मतदारसंघांमध्ये नरके विरुद्ध पाटील हे पारंपारिक राजकीय शत्रू आहेत. हे राजकीय शत्रुत्व कायम राहणार असल्याचे देखील राहुल पाटील यांनी यावेळी बोलून दाखवले आहे.दरम्यान महाविकास आघाडीमध्ये आपल्या कार्यकर्त्यांची घुसमट होत असून त्यामुळेच आम्ही काँग्रेस पक्षाला सोडचिठ्ठी देत आहोत, असं राहुल पाटील म्हणालेत. येत्या सोमवारी २५ ऑगस्ट रोजी उपमुख्यमंत्री अजित पवार कोल्हापूर जिल्ह्याच्या दौऱ्यावर येत आहेत. यावेळी मोठं शक्ती प्रदर्शन करत राहुल पाटील राष्ट्रवादी काँग्रेस पक्ष अजित पवार गटामध्ये प्रवेश करणार आहेत.

# बेस्ट पतपेढी निवडणुकीत ठाकरे बंधूंचा धुव्वा, देवेंद्र फडणवीस म्हणाले, मतदारांनी त्यांना नाकारलं

**पुणे :** बेस्ट पतपेढी निवडणुकीत शिवसेना उद्धव बाळासाहेब ठाकरे पक्षाचे प्रमुख उद्धव ठाकरे आणि मनसे अध्यक्ष राज ठाकरे हे एकत्र आले होते. पण ठाकरे बंधूंच्या पॅनलला एकाही जागेवर यश मिळवता आलेलं नाही. याउलट भाजपचे शशांक राव यांच्या पॅनलचे १४ तर प्रसाद लाड यांचे ७ उमेदवार निवडून आले. त्यामुळे भाजपचं बेस्ट पतपेढीवर वर्चस्व आलं. गेल्या अनेक वर्षांपासून उद्धव ठाकरे यांच्या नेतृत्वातील शिवसेनेचा पतपेढीत बोलबाला होता. पण दोन्ही ठाकरे बंधूंचा या निवडणुकीत दारुण पराभव झाला आहे. ठाकरे बंधूंच्या पराभवावर मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी आपली पहिली प्रतिक्रिया दिली. ते पुण्यात पत्रकारांसोबत बोलत होते.पहिल्यांदा माझं मत होतं की, अशा प्रकारच्या निवडणुकीचं राजकीयकरण करण्यात येऊ नये. ही पतपेढीची निवडणूक होती. पण त्यांनीच त्याचं राजकीयकरण केलं. कामगार नेते शशांक राव हे देखील आमचेच आहेत. तसेच आमदार प्रसाद लाड हे देखील आमचेच आहेत. ते उभे होते. आम्ही कुठलंही राजकीयकरण केलं नाही. आता दोन ठाकरे बंधू एकत्र. ब्रँड ठाकरे निवडून येणार, अशा प्रकारचं राजकीयकरण केलं. ते लोकांना आवडलेलं दिसत नाही. त्यामुळे त्यांना एकही जागा मिळालेली नाही. एकप्रकारे मतदारांनी या निवडणुकीत तरी त्यांना नाकारलं आहे. पण मी पुन्हा सांगतो की, मला याचं राजकीयकरण करायचं नाहीङ्कङ्क, अशी प्रतिक्रिया देवेंद्र फडणवीस यांनी दिली.यानंतर देवेंद्र फडणवीस यांनी मंत्री संजय शिरसाट यांच्यावर



केलेल्या आरोपांवरही देवेंद्र फडणवीस यांनी प्रतिक्रिया दिली. ङ्कइरोहीत पवार किंवा ही सगळी मंडळी रोज असे आरोप करत असतात. पुरावे दिले पाहिजेत ना, पुराव्याशिवाय आरोप करु नये. अर्थात मी ती केस काही अजून बघितलेली नाही. पुराव्यांनुसार आरोप केले तर त्यावर उत्तर देखील मिळतीलङ्कङ्क, असं देवेंद्र फडणवीस म्हणाले.दरम्यान, देवेंद्र फडणवीस यांनी यावेळी पावसामुळे झालेल्या नुकसानीवरही प्रतिक्रिया दिली. ङ्कइराज्यात आता परिस्थिती बऱ्यापैकी कंट्रोलमध्ये आलेली आहे. आपत्ती व्यवस्थापनाबाबत जी काळजी घ्यायला हवी ती घेतलेली आहे. जिथे नद्या इशारा पातळीच्या वर गेलेल्या आहेत त्या ठिकाणी विसर्ग वाढवून किंवा धरणांमधून त्याचं मॅनेजमेंट करण्याचं काम सुरू आहे. वेगवेगळ्या राज्यांसोबत चर्चा सुरू आहेत. त्यांचं सहकार्य सुद्धा आपल्याला मिळत आहे. जास्त विसर्ग वाढवण्याची वेळ आली तर आपण त्यांना पुन्हा पुन्हा विनंती करूङ्कङ्क, अशी माहिती देवेंद्र फडणवीस यांनी दिली.

# ठाण्यात धुवाधार! गणेशोत्सवाच्या तोंडावर कारखान्यांत पाणीच पाणी, मूर्तीचे प्रचंड नुकसान...

**ठाणे :** अवघ्या एक आठवड्यावर गणेशोत्सव येऊन ठेपलेला असताना धुवाँधार पावसामुळे ठाण्यात सखल भागातील गणपती कारखाने व गणेश मूर्ती विक्री केंद्रात पाणी शिरले. त्यामुळे मूर्तिकरांना मोठा फटका बसला लाखोंचे नुकसान झाले आहे. दुसरीकडे उत्सवाच्या तोंडावर पावसाने जोर धरल्याने मुख्य बाजारपेठांकडे खरेदीसाठी ग्राहकांनी पाठ फिरवली आहे. तसेच सार्वजनिक गणेशोत्सव मंडळांकडून सजावटीसह देखाव्यावर अखेरचा हात फिरवण्याची वेळ आलेली असताना पावसाने उसंत न घेतल्याने पदाधिकारीही त्रस्त झाले आहेत.ठाण्यात गेल्या काही वर्षात रस्त्यांच्या कडेला मंडप टाकून गणेश मूर्ती विक्री करण्याचे प्रमाण मोठ्या प्रमाणात वाढले आहे. ठाणे महापालिका, वाहतूक शाखेकडून रीतसर परवानगी काढून लहानमोठे विक्रेते गणेश मुर्त्यांची विक्री करतात. मात्र दोन दिवसांपासून सुरु असलेल्या पावसाचा फटका या विक्रेत्यांना बसला. लोढा गृहसंकुलानजीक असलेल्या शिळकर आर्टस् येथील मंडपात पावसाचे पाणी शिरले. त्यामुळे या मंडपातील मुर्त्यांसह या भागातील अनेक मूर्ती विक्रेत्यांना त्रास सहन करावा लागला. तसेच माजिवडा येथील गणेश कलानिकेतन या गणपती कारखान्यातही पाणी शिरले. यावेळी पावसाच्या पाण्यापासून मुर्त्यांचे संरक्षण करण्यासाठी त्यांना स्टँडवर ठेवण्यात आले असून लहानसहान विक्रेत्यांसाठी हे नुकसान मोठे आहे. त्यामुळे प्रशासनाने याबाबत योग्य नुकसान भरपाई द्यावी, अशी मागणी मूर्ती विक्रेत्यांनी केली आहे. गणेशोत्सव देखावा, सजावट, विद्युत रोषणाईचे साहित्य अशा बाबींना पावसाचा मोठा फटका बसला. बाजारातील शेवटच्या क्षणी हे साहित्य मिळताना अडचणी येतात. तर काल्पनिक देखावे आणि इतर प्लास्टर ऑफ पॅरिसचा वापर करून केली जाणारी सजावटी अशा वातावरणात सुकण्यासाठी तसेच त्याच्यावर रंगकाम करताना मोठ्या अडचणींना तोंड द्यावे लागते, असेही ठाणे जिल्हा गणेशोत्सव समन्वय संस्थेचे अध्यक्ष समीर सावंत यांनी सांगितले.

दैनिक जनसंचलन निडर निर्भिड
व्यापक जनचळवळीचा प्रहरी!



# फक्त १५ दिवसांत केस गळणं पूर्ण थांबेल, उगवतील नवीन काळेभोर केस, फक्त करा हे १ काम, डॉक्टरांनी दिली १००% गॅरेंटी

बऱ्याचदा आपण केसगळतीवर वेगवेगळे शॅम्पू, तेल, कंडिशनर वापरतो. काही काळासाठी परिणाम दिसूनही येतो पण पुन्हा केसगळती सुरूच होते. ही समस्या वाढली की मनात ताण येतो आणि आत्मविश्वास कमी होतो. बाजारात मिळणाऱ्या उत्पादनांमध्ये रसायनांचे प्रमाण जास्त असल्यामुळे केसांची मूळ समस्या कायम राहते. अशावेळी नैसर्गिक उपायांचा विचार केल्यास ते सुरक्षित आणि दीर्घकालीन परिणाम देतात.अलीकडेच सोशल मीडियावर उमंग खुराना या होमिओपॅथिक तज्ज्ञाने असा एक सोपा पण प्रभावी घरगुती प्रयोग शेअर केला आहे ज्यावर बऱ्याच लोकांचा विश्वास बसला आहे. या उपायामुळे केवळ केसगळती थांबतेच असे नाही तर नव्या केसांची वाढ होण्यास देखील मदत होते. आज आपण या नैसर्गिक उपायाबद्दल सविस्तर जाणून घेऊयारोजमेरी ही एक औषधी वनस्पती आहे जी केसांच्या आरोग्यासाठी अत्यंत फायदेशीर मानली जाते. तज्ज्ञांच्या मते रोजमेरी मिनोक्सिडिलसारख्या बाजारातल्या औषधी घटकांपेक्षा जास्त प्रभावी ठरू शकते. रोजमेरीमुळे टाळूतील रक्ताभिसरण सुधारते, केसांच्या मुळांना पोषण मिळते आणि नवीन केस उगवण्यास मदत होते. नियमित वापर केल्यास केस गळणे कमी होऊन केसांची घनता वाढते.

**तांदूळ केस मजबूत करतात**

आपल्या घरात नेहमी वापरला जाणारा तांदूळ केवळ आरोग्यासाठीच नव्हे तर केसांसाठीही उत्तम मानला जातो. तांदूळामध्ये असणारे जीवनसत्त्वे आणि खनिजे केसांच्या मुळांना बळकट करतात. यामुळे केस तुटणे थांबते. शिवाय, तांदुळाच्या पाण्यामुळे केसांवर नैसर्गिक चमक येते आणि फ्रीझ कमी होतो. या कारणामुळे केस अधिक मऊ, लवचिक आणि निरोगी दिसतात.

**तिळाचे पोषण टाळूसाठी आवश्यक**


तिळामध्ये भरपूर प्रमाणात कॅल्शियम, मॅग्नेशियम, प्रथिने आणि अँटिऑक्सिडंट्स असतात. हे घटक केसांना आतून पोषण देतात. नियमित वापराने अकाली पांढरे होणारे केस थांबतात आणि टाळू अधिक निरोगी राहतो. तिळाच्या गुणधर्मामुळे केसांना मुळापासून ताकद मिळते

**उपाय कसा तयार करावा**

हा उपाय बनवण्यासाठी साधे घटक लागतात. दोन ग्लास पाण्यात रोजमेरीची पानं, तांदूळ आणि तिळ एकत्र उकळावे. पाणी अर्धे होईपर्यंत ते उकळत ठेवावे. तयार झालेला काढा थंड होऊ द्यावा आणि रात्री केसांना लावावा. सकाळी स्वच्छ पाण्याने केस धुवावेत. हा उपाय १५ दिवस नियमित केल्यास फरक स्पष्टपणे दिसून येतो.

**सततच्या वापराने दिसणारे परिणाम**

होमिओपॅथिक तज्ज्ञ उमंग खुराना यांनी दिलेल्या या १५ दिवसांच्या चॅलेंजमध्ये अनेकांनी सकारात्मक परिणाम अनुभवले आहेत. केसगळती थांबते, केस अधिक दाट होतात आणि नव्या केसांची वाढ दिसून येते. नैसर्गिक उपाय असल्यामुळे कोणतेही दुष्परिणाम होत नाहीत. यामुळे हा प्रयोग सुरक्षित आणि प्रभावी ठरतो.




# एकताने मला चपलेनं मारलं असतं... उषा नाडकर्णींना आलेली सलमान खानच्या बिग बॉसची ऑफर, पण...



**मुंबई** - उषा नाडकर्णी यांनी मराठीसह हिंदी कलाविश्व गाजवलं आहे. अनेक वर्षांपासून उषा इंडस्ट्रीत सक्रीय असून प्रेक्षकांचं मनोरंजन करत आहेत. त्यांनी अनेक नाटक, मालिका आणि सिनेमांमध्ये काम केलं आहे. त्यांची पवित्र रिश्ता ही हिंदी मालिका प्रचंड गाजली. उषा नाडकर्णी बिग बॉस मराठीमध्येही सहभागी झालेल्या. उषा नाडकर्णी यांना हिंदी बिग बॉसचीही ऑफर आलेली. याबद्दल त्यांनी नुकत्याच एका मुलाखतीमध्ये सांगितलं आहे.उषा नाडकर्णी यांनी नुकतीच पिंकव्हीलाला मुलाखत दिली. या मुलाखतीदरम्यान त्या म्हणाल्या की, मला पहिलंच बिग बॉससाठी दोनदा विचारण्यात आलं होतं. पण, मी नाही सांगितलं कारण तेव्हा मी पवित्र रिश्तामध्ये काम करत होते. जर मी मालिका सोडून बिग बॉसमध्ये गेले असते तर एकता कपूरने मला चपलेने मारलं असतं बिग बॉस मराठीचा अनुभव सांगताना उषा नाडकर्णी म्हणाल्या की, बिग बॉसमधून ज्या दिवशी मी घरी गेले तेव्हा मी भावाला घरी यायला सांगितलं होतं. जेव्हा मी घर बघितलं मी म्हटलं हॉल कोणी छोटा केला? तर भाऊ म्हणाला मोठ्या घरात राहून आलीस तर हे छोटंच वाटणार.मी वेडी झाले होते. माझा गॅस ऑटोमॅटिक आहे की लायटरने चालू होतो तेसुद्धा आठवत नव्हतं. फोन कसा वापरायचा ते पण आठवत नव्हतं. मी सगळं विसरून गेले होते. माझा नंबर मला आठवत नव्हता. पहिल्याच वेळी एलिमिनेशन टास्कमध्ये ४-५ जणांनी माझं नाव घेतलं. माझं कोणाशीही भांडण नव्हतं. तेव्हा मला वाईट वाटलं होतं. मी विचार करत बसले आणि त्यामुळे माझं बीपी वाढलं. मला पहिल्याच दिवशी हॉस्पिटलमध्ये घेऊन जावं लागलं होतं. असं उषा नाडकर्णी यांनी पुढे सांगितलं. दरम्यान, उषा नाडकर्णी यांच्या कामाबद्दल सांगायचं तर त्यांनी खुलता कळी खुलेना, सुंदर आमचं घर, नशीबवान, माहेरची साडी, देऊळ यांसारख्या गाजलेल्या मालिका आणि सिनेमांमध्ये काम केलं आहे. त्याचबरोबर त्या हल्लीच सेलिब्रिटी मास्टरशेफ मध्येही सहभागी झालेल्या.

# वॉर २ च्या अपयशाचा महावतार नरसिंह ला मोठा फायदा



मुंबई: अश्विन कुमार यांच्या महावतार नरसिंह या चित्रपटानं बॉक्स ऑफिसवर अनेक रेकॉर्ड्स मोडले आहेत. सिनेमा रिलीज झाल्यानंतर जवळपास एक महिना उलटून गेला तरी, चित्रपटानं बॉक्स ऑफिसवर आपली पकड कायम ठेवली आहे. वॉर २ ला अपेक्षित यश न मिळाल्यानं महावतार नरसिंह च्या हिंदीतील कमाईत वाढ झाली आहे आणि हा चित्रपट लवकरच जगभरात २५० कोटींचा टप्पा पार करेल, असा अंदाज आहे. या चित्रपटानं प्रदर्शनाच्या २६ व्या दिवशी २.६५ कोटींची कमाई केली आहे.महावतार नरसिंहनं २६ व्या दिवशी सर्व भाषांमध्ये मिळून सुमारे २.६५ कोटींची कमाई केली. हिंदी भाषेत चित्रपटानं २.१९ कोटींची कमाई केली, जी आदल्या दिवसाच्या तुलनेत ९३% जास्त आहे. आदल्या दिवशी चित्रपटानं १.५० कोटींची कमाई केली होती.या चित्रपटानं तेलगू आणि मल्याळम भाषेमध्येही चांगली कमाई केली आहे, तर तमिळ आणि कन्नड भाषेतील प्रदर्शन आता कमी झाले आहे. भारतातील या चित्रपटाची एकूण कमाई २१४.६१ कोटींवर पोहोचली आहे. सिनेमाची एकूण कमाई २५३.२३ कोटींवर गेली आहे. वॉर २ च्या अपयशामुळे महावतार नरसिंहला मोठा फायदा झाल्याचं दिसतंय.हृतिक रोशन आणि ज्युनियर एनटीआर यांचा वॉर २ चित्रपट बॉक्स ऑफिसवर अपेक्षेप्रमाणे कमाई केली नाहीये. प्रेक्षकांच्या सुरुवातीच्या प्रतिक्रियांमुळेप्रेक्षक आता महावतार नरसिंहकडे वळले आहेत.अपेक्षित वेळेपेक्षा जास्त काळ हा चित्रपट बॉक्स ऑफिसवर चालेल आणि २५० कोटींचा टप्पा गाठू शकेल, असा अंदाज आहे. महावतार नरसिंहा लवकरच सितारे जमीन पर चित्रपटाच्या कमाईला मागे टाकेल. महावतार नरसिंह हा भारतीय बॉक्स ऑफिसवरील २०२५मध्ये तिसरा सर्वाधिक कमाई करणारा चित्रपट ठरला आहे. या चित्रपटाच्या पुढं छावा (६१५.३९ कोटी) आणि सैयारा (३३२.३७ कोटी) हे दोनच चित्रपट आहेत.

# व्हाट्सअपवर मुलींचे फोटो, प्रीमियम ग्राहकच टार्गेट, नागपुरात आई-मुलाचा कारनामा, पोलिसांनी छापा टाकताच...

**नागपूर :** नागपूर शहराच्या हुडकेश्वर भागात घडलेली अलीकडील घटना नागपूरकरांसाठी हादरवून सोडणारी ठरली आहे. कारण, अनेकदा अशा रॅकेट्सच्या मागे बाहेरील टोळ्या किंवा संघटित गुन्हेगारी मंडळी असल्याचे आढळत असे. मात्र यावेळी देहव्यापाराचा हा गोरखधंदा आई आणि मुलगा यांनीच एकत्र येऊन रचला होता.नागपूर क्राइम ब्रांचच्या सामाजिक सुरक्षा विभागाने दिलेल्या माहितीनुसार, आरोपी सुनीता विकास कांबळे (वय ४६) आणि तिचा मुलगा यश विकास कांबळे (वय २६) यांनी हुडकेश्वर येथील संत ताजेश्वर नगरात एक फ्लॅट भाड्याने घेतला होता. बाहेरून ते आरटीओ दलालीचे काम करतात, असं सांगायचे. मात्र, प्रत्यक्षात त्या घरातून मागील सहा महिन्यांपासून देहव्यापार चालवला जात होता.या धक्कादायक कारवाईदरम्यान पोलिसांनी छत्तीसगडमधील २७ वर्षीय एका युवतीची सुटका केली. पैशांचे आमिष दाखवून तिला नागपुरात आणण्यात आलं होतं. तपासात उघड झालं की आरोपी प्रीमियम ग्राहकांनाच लक्ष्य करत होते. व्हाट्सअपवर मुलींचे फोटो पाठवून ग्राहकांशी व्यवहार निश्चित केला जात होता.

पोलिसांनी बनावट ग्राहक पाठवून केवळ हजार रुपयांत सौदा ठरवला आणि त्यानंतर छापा मारत आई आणि मुलाला रंगेहात अटक केली.घटनेतील सर्वात संतापजनक बाब म्हणजे आईच स्वतःच्या मुलासोबत अशा घृणास्पद कृत्यात सहभागी झाली होती. समाजातील नैतिक मूल्यांचा झालेला ऱ्हास आणि पैशांसाठी माणुसकीचा कसा बळी दिला जातो, याचं हे ज्वलंत उदाहरण आहे. नागरिकांना अपेक्षा असते की घर हे सुरक्षित ठिकाण असावं. परंतु येथे आई-मुलगा एकत्र येऊन गुन्हा रचतात, हे अत्यंत



चिंताजनक आहे. पोलिसांनी पीटा कायद्यांतर्गत गुन्हा दाखल करून पुढील तपास सुरू केला आहे. नागपूरसारख्या शहरात कुटुंबीयच अशा गोरखधंद्यात उतरतात, ही बाब समाजाला आत्मपरीक्षणाचा इशारा देणारी आहे. आता पोलिसांनी फक्त दोन आरोपींवर कारवाई करून थांबू नये, तर या प्रकरणाच्या मुळाशी जाऊन संपूर्ण रॅकेट उद्ध्वस्त करणे गरजेचं आहे.बांगलादेशी नागरिकाने बनावट दस्तऐवजाआधारे भारतीय पासपोर्ट बनवून नागपुरात वास्तव केल्याची खळबळजनक घटना उघडकीस आली आहे. या प्रकरणी गिट्टीखदान पोलिसांनी बांगलादेशी नागरिकाविरूद्ध गुन्हा दाखल केला आहे.

# ५० खोके म्हणताच आमदारांच्या पत्नी अंगावर धावल्या

**रायगड :** अलिबाग, मुरुड, रोहा तालुक्यांत रस्त्यांची झालेली दुरावस्था, प्रलंबित प्रश्न, मुरुड मिठेखार येथे दरड कोसळून झालेल्या घटने बाबत प्रशासनाला जाब विचारला, स्थानिक प्रतिनिधी करतात काय ? असा प्रश्न उपस्थित केला. ५० खोके असे म्हटल्यानंतर शेकापच्या नेत्या






चित्रलेखा पाटील यांच्यावर आमदारांच्या पत्नी मानसी दळवी अंगावर धावून आल्या आणि वाद निर्माण झाला. याचा निषेध करण्यासाठी आज अलिबाग येथे शेतकरी कामगार पक्षाचे कार्यकर्ते रस्त्यावर उतरत मानसी दळवी आणि त्यांच्या कार्यकर्त्यांचा काळे झेंडे बॅनर आणि घोषणा देऊन जाहीर निषेध करण्यात आला यावेळी शेकापचे कार्यकर्ते मोठ्या संख्येने उपस्थित होते.रायगडमधील मुरूड परिसरात दरड कोसळली या दुर्घटनेमध्ये विठा गायकर या महिलेचा मृत्यू झाला. दरड कोसळलेल्या भागाची पाहणी करण्यासाठी शेतकरी कामगार पक्षाच्या नेत्या चित्रलेखा पाटील या घटनास्थळी दाखल झाल्या होत्या. तेथे शिवसेनेचे स्थानिक आमदार महेंद्र दळवी यांच्या पत्नी मानसी दळवीही दाखल झाल्या. तेथील आढावा घेतना चित्रलेखा पाटील म्हणाल्या की, ही बाब गंभीर आहे यामध्ये राजकारण आणलं नाही पाहिजे. जो दोषी आहे त्याच्यावर कारवाई केली पाहिजे. किती दिवस तो चिखलाचा रस्ता आणि सर्व सहन करणार. आमच्या जीवनाची किंमत आहे की नाही. गरीब माणसाच्या जीवनाची किंमतच नाही. असा सवाल त्यांनी उपस्थित केला. त्या पुढे म्हणाल्या हे काय पन्नास खोके कोण काय? हे सर्व घाणेरडं चाललंय राजकारण आणि समाजकारण. त्यानंतर मागे उभ्या असलेल्या मानसी दळवी या पाटील यांच्या अंगावर धावून गेल्या. तेथे उपस्थित असलेल्या नागरिकांनी वेळीच हस्तक्षेप केल्याने परिस्थिती हाताबाहेर गेली नाही.२०२४ मध्ये मानसी दळवी यांनी अधिकाऱ्यांना मारहाण केल्याची घटना समोर आली होती. अलिबागमधील आरसीएफ शाळा बंद करत त्यातील विद्यार्थ्यांना अन्य शाळेत समायोजनचा घाट घातला जात होता. त्यामुळे शिक्षण विभागातील अधिकाऱ्यांना मारहाण केल्याचे बोलले जात होते

# घरातून निघाला तो परतलाच नाही, तलावाजवळ गाडी दिसली अन् कुटुंबाने टाहो फोडला...

**बुलढाणा:** एका तरुणाने घरापासून जवळच असलेल्या गावातील एका तलावात उडी घेत आपली जीवन यात्रा संपवली. त्याने हा टोकाचा निर्णय का घेतला, याबाबत मात्र काही नेमकं कारण काय, याचीच सध्या गावात सर्वत्र चर्चा होत आहे. बुलढाणा जिल्ह्यातील खामगाव तालुक्यातील सतीफईल भागातील एका २५ वर्षीय तरुणाने रात्रीच्या वेळी गावालगतच्या प्रसिद्ध जणूंना तलावात उडी घेत आपल्या आयुष्याची अखेर केल्याची खळबळजनक घटना घडली. या घटनेने परिसरात एकच शोककळा पसरली. मात्र, या युवकाने तडकाफडकी हा निर्णय का घेतला यावर देखील तर्कवितर्क लावले जात आहेत.खामगाव तालुक्यातील सतीफईल भागातील स्वप्निल विजय गायकवाड (२५ वर्ष) हा तरुण रात्री अचानक दुचाकी घेऊन कुठेतरी निघून गेला. नेहमीप्रमाणे तो आपल्या मित्रांकडे किंवा फेरफटका मारायला गेला असेल असं कुटुंबातील लोकांना वाटलं. मात्र, उशीर होऊन गेला तरी तो परत न आल्याने कुटुंबीय आणि मित्रांनी त्याची शोधा शोध सुरू केली. जणूंना तलावानजीक त्याची दुचाकी उभी दिसली. काहीतरी विचित्र घडलं असल्याचं संशय वाढला असताच त्याचा मृतदेह तलावात दिसून आला. त्याचा मृतदेह पाण्यावर तरंगताना आढळल्यानंतर कुटुंबीयांनी एकच टाहो फोडला आणि मित्रांनीही आक्रोश केला. सदर घटनेची माहिती मिळताच पोलिसांनी घटनास्थळी धाव घेतली आणि नागरिकांच्या मदतीने मृतदेह बाहेर काढला. या घटनेने परिसरात एकच हळहळ व्यक्त होत आहे. याप्रकरणी शिवाजीनगर पोलिसांनी अकस्मित मृत्यूची नोंद केली आहे. स्वप्निल गायकवाडने जीव का दिला? याबाबत अद्याप नेमकं कारण समजू शकलेलं नाही.ज्या तरुण वयात मुलं ताण-तणावात किंबहुना नोकरी किंवा व्यवसायाकडे वळत असतात, घरातील वडिलधाऱ्या माणसांसोबत अनुभवी मित्र वर्ग परिसरातील त्यांच्या संगतीत असलेल्या मित्रांनी देखील कायम आपल्यासोबत असलेल्या सदस्याला सतत बोलत ठेवत त्याची कोणती पीडा तर नाही ना हे जाणून घेण, त्याला योग्य मार्गदर्शन आणि आयुष्य किती महत्त्वाचे आहे यावर चर्चा करणे आवश्यक आहे.

दैनिक निडर निर्भिड जनसंचलन
व्यापक जनचळवळीचा प्रहरी!



# धार्मिक सण, जयंती उत्सव परवानगीसाठी ऑनलाईन अर्ज करण्याचे आवाहन

जनसंचलन/बुलढाणा

गणेशउत्सव, दुर्गाउत्सव, विविध जयंती उत्सव तसेच इतर धार्मिक व सांस्कृतिक उत्सव साजरे करण्यासाठी महाराष्ट्र सार्वजनिक विशस्त व्यवस्था अधिनियम १९५० च्या कलम ४१-क अन्वये परवानगी घेणे बंधनकारक आहे. यासाठी सर्व मंडळांनी परवानगी अर्ज ऑनलाईन पध्दतीने सादर करावे, असे आवाहन सहायक धर्मदाय आयुक्त दु.के. साहू यांनी केले आहे. परवानगी अर्ज धर्मादाय आयुक्त, मुंबई यांच्या .... अधिकृत संकेतस्थळावर ॠमाहिती प्रणालीफ या सदराखाली ४१-क परवानगी या शिर्षकात उपलब्ध आहे. अर्ज करण्याची सविस्तर पद्धत तसेच आवश्यक कागदपत्रांची माहिती या ठिकाणी देण्यात आली आहे. ऑनलाईन अर्जासाठी आवश्यक कागदपत्रे : मंडळाच्या ठरावाची प्रत, जागा मालकाचे ना-हरकत पत्र, तसेच पत्याच्या पुराव्यासाठी लाईट बिल व आधारकार्डची प्रत(संबंधित ग्रामपंचायत/नगरपरिषद परवानगीसह), पदाधिकाऱ्यांचे ओळखपत्र (आधारकार्ड, पॅनकार्ड, निवडणूक आयोग ओळखपत्र इ.) प्रथम वर्ष असल्यास मागील वर्षाचा हिशोब, मागील वर्षी घेण्यात आलेल्या ४१- परवानगीची प्रत कागदपत्रांची आवश्यकता नाही. परवानगी मिळण्यासाठी वरील सर्व कागदपत्रे ऑनलाईन अपलोड करणे आवश्यक असून, अर्ज मंजूर झाल्यानंतर परवानगीची प्रत संबंधित मंडळांना ई-मेलद्वारे प्राप्त होईल. उत्सव साजरा करण्यासाठी वेळेत परवानगी अर्ज ऑनलाईन पद्धतीने सादर करावा व आवश्यक कागदपत्रांची पूर्तता करावी, असे प्रसिद्धी पत्रकाव्दारे कळविण्यात आले आहे.

# जिल्हा परिषद व पंचायत समित्या सार्वत्रिक निवडणुक; अंतिम प्रभाग रचना जाहीर

जनसंचलन/बुलढाणा





महाराष्ट्र जिल्हा परिषद व पंचायत समित्या अधिनियम १९६१ नुसार बुलडाणा जिल्हा परिषद तसेच त्याअंतर्गत येणाऱ्या १३ पंचायत समित्यांच्या सार्वत्रिक निवडणुक -२०२५ अनुषंगाने प्रभागाच्या भौगोलिक सीमा निश्चित करण्यात आल्या आहेत. सदर अंतिम प्रभाग रचना परिशिष्ट ८ (अ) व परिशिष्ट ८ (ब) या स्वरूपात तयार करण्यात आलेली असून ती आज दिनांक २२ ऑगस्ट २०२५ रोजी सर्व पंचायत समिती व तहसिल कार्यालयांचे सूचना फलक तसेच जिल्हाधिकारी कार्यालय व जिल्हा परिषद कार्यालयाच्या सूचना फलकावर प्रसिध्द करण्यात आले आहे, अशी माहिती जिल्लहाधिकारी डॉ. किरण पाटील यांनी दिली आहे. या अंतिम प्रभाग रचनेच्या प्रकाशनामुळे जिल्हा परिषद व पंचायत समित्यांच्या सार्वत्रिक निवडणुकीसंदर्भातील प्रक्रिया पुढे वेगाने गतीमान होणार असून, निवडणुकीसाठी इच्छुक उमेदवार व मतदारांना प्रभाग रचनेबाबत सुस्पष्ट माहिती मिळणार आहे.

# बसस्थानकात सोन्याची पोत चोरणाऱ्या तीन महिलांची न्यायालयीन कोठडीत रवानगी

जनसंचलन/ चिखली

बसस्थानकावर गर्दीचा फायदा घेत वृद्धेच्या गळ्यातील सोन्याची पोत जबरदस्तीने चोरणाऱ्या तीन महिलांना पोलिसांनी रंगेहात पकडून तुरुंगात पाठवले. ही घटना २२ ऑगस्ट रोजी चिखली बसस्थानकात घडली. गजानन नगर येथील कासुबाई खरात (६५) या मुलीसोबत बसस्थानकात उभ्या असताना तिघींनी त्यांना घेरले. एका महिलेनं हात धरला, दुसरीने पायावर पाय दिला तर तिसरीने गळ्यातील सुमारे २७ हजार रुपये किंमतीचे दागिने ओढून नेले. कासुबाईच्या आरडाओरडीनंतर २७हजार रूपयांचे दागिने चोरुन नेले पोलिस कर्मचारी निलेश सावळे घटनास्थळी दाखल झाले. स्थानिकांच्या माहितीच्या आधारे पोलिसांनी संगीता पवार (३५, विरेगाव, जालना), निशा धोत्रे (२४, रेवकी, गेवराई) आणि शेषुबाई पवार (४४, मंगरूळ, जालना) या तिघींना ताब्यात घेतले. चौकशीत त्यांनी गुन्ह्याची कबुली दिली असून त्यांची न्यायालयाने न्यायालयीन कोठडीत रवानगी केली आहे. ठाणेदार संग्राम पाटील यांच्या मार्गदर्शनाखाली डिबी पथकाने ही कारवाई केली. दरम्यान, जिल्ह्यात गेल्या काही दिवसापासून सोनसाखळी चोरीच्या घटनांमध्ये वाढ झाली असून सिंदखेड राजामध्येही असे दोन प्रकार घडले आहेत.




# बहु-उत्पादन उच्च मूल्य क्लस्टर व पेरि-अर्बन भाजीपाला क्लस्टर स्थापनेसाठी इच्छुक संस्थांकडून प्रस्ताव मागविले....

जनसंचलन/बुलढाणा



केंद्र शासनाच्या कृषी व शेतकरी कल्याण मंत्रालयामार्फत राष्ट्रीय बागायती मंडळाच्या मार्गदर्शनाखाली बहु-उत्पादन उच्च मूल्य क्लस्टर तसेच पेरि-अर्बन भाजीपाला क्लस्टर स्थापनेसाठी इच्छुक संस्थांकडून अभिरुची दर्शविण्याकरिता प्रस्ताव मागविण्यात आले आहेत. या योजनेद्वारे शेतकरी उत्पादक कंपन्या आणि शेतकरी गटांच्या माध्यमातून उत्पादन, प्रक्रिया, साठवण, मूल्यवर्धन, विपणन यासोबतच तंत्रज्ञानाचा वापर करून कृषी उत्पादनक्षमता वाढविण्यावर भर दिला जाणार आहे. बहु-उत्पादन उच्च मूल्य क्लस्टर : आंबा, डाळिंब, द्राक्ष, केळी, लिंबूवर्गीय फळे, टोमॅटो, कांदा, बटाटा, भाजीपाला, फुलशेती, मसाले पिके इत्यादींवर भर. शेतकरी गटांना प्रक्रिया, साठवण, कोल्ड स्टोरेज, ट्रान्सपोर्ट, निर्यात सुविधा उपलब्ध होणार. प्रस्तावित प्रकल्पासाठी किमान वार्षिक २०० कोटी रुपये असणे बंधनकारक. प्रकल्पात किमान २०% शेतकरी घटकाचा सहभाग आवश्यक. २० टक्के टर्म लोन व किमान २० टक्के इक्विटी कॉन्ट्रीबुशन अनिवार्य. पेरि-अर्बन भाजीपाला क्लस्टर : टोमॅटो, कांदा, बटाटा, ढोबळी मिरची, गवार, मटार, वांगी, कोबी, फ्लॉवर, मुळा, शेवगा, पालक, कारली, भोपळा, दोडका, लिंबू, आले, हिरवी मिरची इत्यादी प्रमुख भाजीपाला पिके. शेतकऱ्यांच्या भाजीपाला उत्पादनाचे संकलन, प्रक्रिया, साठवण, विपणन, निर्यात यावर भर. किमान १५ कोटी रुपये असणे आवश्यक. २० टक्के टर्म लोन व किमान २० टक्के इक्विटी कॉन्ट्रीबुशन अनिवार्य. अर्थसहाय्याचे स्वरूप : एकुण प्रकल्प खर्च , या दोन घटकामध्ये विभागलेला आहे. दोन एकूण प्रकल्प मूल्यामध्ये शेतकरी घटक कमीत कमी ४० टक्के असावा, दोन्ही संकल्पनांमधील घटकाची अंमलबजावणी विहित कालमर्यादेमध्ये पुर्ण केल्यास प्रोत्साहनात्मक ५ टक्के अतिरिक्त निधी अनुज्ञेय राहील. मात्र सदर प्रकल्पाकरीता बांधकाम या घटकावरील एकूण खर्च हा प्रकल्प खर्चाच्या ३० टक्के पेक्षा जास्त नसावा. नवीन तंत्रज्ञानाचा अवलंब केल्यास त्यास प्रकल्प खर्चाच्या १० टक्के प्रोत्साहनात्मक अतिरिक्त निधी अनुज्ञेय राहील. अर्ज करण्याची कार्यपद्धती: प्रस्ताव सादर करणेकरीता अंमलबजावणी यंत्रणेचे पात्रता निकष व सविस्तर मागदर्शक सुचना राष्ट्रीय फलोत्पादन मंडळ यांच्या या संकेतस्थळावर उपलब्ध करून देण्यात आलेल्या आहे. त्यानुषंगाने अंमलबजावणी यंत्रणेकरीता इच्छुक अर्जदारांनी ऑनलाईन अर्ज सादर करावेत. दि. १५ ऑगस्ट २०२५ ही दुस-या टप्प्यातील होती. परंतु राष्ट्रीय बागवाणी मंडळ, नवी दिल्ली यांनी दि. २५ ऑगस्ट २०२५ पर्यंत मुदतवाढ देण्यात आलेली आहे. सदर कार्यक्रमांतर्गत अंमलबजावणी यंत्रणा () म्हणून काम करण्यासाठी इच्छुक अर्जदारांनी ऑनलाईन पोर्टलद्वारे या वेबसाईटर अर्ज सादर करावेत. अधिक माहितीसाठी योजनेच्या सविस्तर मार्गदर्शक सुचना ://.. राष्ट्रीय बागवानी मंडळ यांच्या वेबसाईटवर उपलब्ध आहेत. योजनेबद्दल अधिक माहितीसाठी शीतल थोरात (८३७८९१३७४३), तेजल खरात (९६६५८६०९८०) व महाराष्ट्र राज्य फलोत्पादन आणि औषधी वनस्पती मंडळ,पुणे कार्यालय २९७०३२२८ यांच्याशी संपर्क करावा.

# अतिवृष्टीमुळे शेतकरी व नागरिक संकटात ; तातडीने आर्थिक मदतीची गरज - ॲड. जयश्री शेळके...

जनसंचलन/बुलढाणा

चार दिवसांपूर्वी झालेल्या अतिवृष्टीमुळे चिखली, मेहकर व सिंदखेडराजा या तालुक्यांमध्ये मोठ्या प्रमाणावर शेती व घरांचे प्रचंड नुकसान झाले आहे. सततच्या पावसामुळे खरीप हंगामातील सोयाबीन, कापूस, उडीद, मूग, मका आणि तूर यांसारखी पिके पाण्याखाली आली. शेतात पाणी साचल्यामुळे मुळे कुजली असून पुन्हा पेरणी करणे शक्य नाही. अनेक शेतकऱ्यांनी कर्ज काढून पेरण्या केल्या होत्या, अनेक शेतकऱ्यांना दुबार पेरणी करावी लागली होती. त्यातच हुमनी अळीने मोठ्या प्रमाणात नुकसान झाल्याने शेतकरी चिंतेत असताना आता पुन्हा अतिवृष्टीमुळे त्यांच्यावर आर्थिक संकट कोसळले आहे. या पार्श्वभूमीवर शिवसेना (उद्धव बाळासाहेब ठाकरे) पक्षाच्या प्रवक्त्या ॲड. जयश्रीताई शेळके यांनी शासनाकडे तातडीने सर्वेक्षण करून शेतकऱ्यांना नुकसान भरपाई जाहीर करण्याची मागणी केली आहे. चिखली शहरातील माळीपुरा परिसर हा नदीकाठचा असल्याने या भागात घरांमध्ये पाणी शिरल्यामुळे अनेक घरांतील अन्नधान्य, जीवनावश्यक वस्तू, धान्य, कपडे व घरगुती साहित्य पूर्णपणे वाहून गेले आहे. परिणामी, या भागातील नागरिकांना मोठ्या अडचणींचा सामना करावा लागत आहे. शासन कर्जमाफी द्यायला तयार नाही. शेतीमालाला भाव नाही. त्यात आता अतिवृष्टीमुळे अस्मानी आणि सुलतानी संकटात बळीराजा सापडला आहे. या पार्श्वभूमीवर आज ॲड. जयश्रीताई शेळके यांनी माळीपुरा परिसरासह चिखली तालुक्यातील भोगावती, सोमठाणा, पेठ आणि बोरगाव काकडे येथील बाधित भागांचा दौरा केला. त्यांनी प्रत्यक्ष घटनास्थळी जाऊन परिस्थितीची पाहणी केली आणि स्थानिक नागरिकांशी संवाद साधून त्यांच्या व्यथा जाणून घेतल्या! चिखली, मोताळा आणि सिंदखेडराजा तालुक्यातील शेतकऱ्यांची शेती पाण्याखाली गेली. अनेक ठिकाणी जमिनी खरडून गेल्या आहेत. पिकं पूर्णपणे नष्ट झाली असून शेतकरी बांधवांवर प्रचंड गंभीर संकट उभं राहिलं आहे. या नैसर्गिक आपत्तीत झालेल्या शेतीच्या प्रचंड नुकसानीचे तात्काळ पंचनामे करून शेतकऱ्यांना आर्थिक मदत देणे अत्यंत आवश्यक आहे, असं मत त्यांनी यावेळी व्यक्त केलं. तसेच ॲड. जयश्रीताई शेळके यांनी चिखलीचे मा. तहसीलदार यांच्याशी संपर्क साधून माळीपुरा व इतर बाधित भागांतील नागरिकांना तातडीने धान्य, जीवनावश्यक वस्तूंचे वाटप करण्याची, तसेच तालुक्यातील अतिवृद्धतीबाधीत शेतीचे पंचनामे करून त्वरित मदत देण्याची विनंती केली. या नुकसान पाहणी दरम्यान चिखली कृषी उत्पन्न बाजार समितीचे मा.संचालक गजानन शेळके, मा.सदस्य सोसायटी पेठ शेषराव शेळके, माजी तंटामुक्ती अध्यक्ष गजानन काकडे, माजी सरपंच तथा ग्रामपंचायत सदस्य दिनकर डुकरे, शिवसेना तालुकाप्रमुख किसनराव धोंडगे,



शिवसेना युवा चिखली तालुका प्रमुख गजानन पवार, शिवसेना शहर प्रमुख श्रीराम झोरे, शिवसेना उपशहरप्रमुख रवि पेटकर, युवासेना उपशहरप्रमुख शंभू गाडेकर, युवासेना समन्वयक अनिल जावरे, शिवसेना जेष्ठ नेते विश्वासराव खंडागळे, मा.सरपंच बोरगाव काकडे गजानन वायाळ, मा. ग्रामपंचायत सदस्य बाळू पाटील, सामाजिक कार्यकर्ते मनोज जाधव, गजानन डुकरे, राजेंद्र पांढरे, दिनकरराव शेळके, विठ्ठल शेळके, हरी गायकवाड, विष्णू गोलाई, सतीश जाधव, प्रा.अनंता काकडे, मधुकर वायाळ, देविदास पाटील, भानुदास चांगून, सागर लोखंडे यांच्यासह सर्व गावांमधील शेतकरी बांधव उपस्थित होते.

# बुलढाणा जिल्हा अधीक्षक कार्यालयात मोबाईल फॉरेन्सिक व्हॅनचे पोलीस अधीक्षकांच्या हस्ते लोकार्पण



जनसंचलन/ बुलढाणा

क्राईम सीन ॲप्लिकेशन अद्ययावत करणे, घटनास्थळी फॉरेन्सिक पथक धडकणार, घटना स्थळावरील पुरावे फोटो, व्हिडिओच्या माध्यमातून एकत्रित करणे, रक्त , डीएनए बलात्काराच्या गुन्ह्यातील पुरावा संकलित होणार यासाठी मोबाईल फॉरेन्सिक व्हॅन आता महत्वपूर्ण ठरणार आहे. गुन्हा सिद्ध करण्यासाठी मोबाईल फॉरेन्सिक व्हॅन चा वापर आता बुलढाणा जिल्ह्यात होणार आहे. जिल्हा पोलीस अधीक्षक कार्यालयात येथे जिल्हा पोलीस अधीक्षक निलेश तांबे हस्ते मोबाईल फॉरेन्सिक व्हॅनचे फीत कापून लोकार्पण करण्यात आले. जिल्ह्यात सध्या १ व्हॅन आली असून अजुन ५ उपविभागीय पोलीस कार्यालयात मोबाईल फॉरेन्सिक व्हॅन सुरू करण्यात येणार असल्याची माहिती जिल्हा पोलीस अधीक्षक निलेश तांबे यांनी दिली आहे. व्हॅनमध्ये रक्त, डीएनए संग्रहण आणि बलात्कारासारख्या गुन्ह्यात आवश्यक पुरावे गोळा करणे. वैज्ञानिक तज्ज्ञ व सहाय्यक कर्मचारी व्हॅनमध्ये आहे. तसेच स्फोटक पदार्थ तपासणी, सायबर गुन्ह्यांमध्ये तपासणीसाठी विशेष फॉरेन्सिक किट्स उपलब्ध आहेत. तसेच व्हॅन सीसीटीव्हीने सज्ज असून कनेक्टेड असणार आहे. त्यामुळे संबंधित पोलीस स्टेशनला सबंधित गुन्ह्या संदर्भात गोळा केलेल्या पुराव्यांची माहिती देता येणे शक्य होणार आहे

# स्वातंत्र्याला ७५ वर्षे उलटूनही राजुरा बुद्रुक गावाला रस्ताच नाही!

जनसंचलन/ जळगाव जामोद

निवडणुका आल्या की आजी-माजी लोकप्रतिनिधी गावातील भोळ्या-भाबड्या जनतेला विविध समस्या बाबत आश्वासनाची घुटी पाजून मोकळे होतात.भारताला स्वातंत्र्य मिळून ७५ वर्ष उलटून गेले मात्र आश्वासनाचा हा डोस या ग्रामस्थांना दिल्या जात असून, विविध मागण्यांपैकी या गावाला अद्यापही रस्ता नाही याचे नवल व्यक्त होत आहे. जळगाव जामोद चे लोकप्रतिनिधी निद्रावस्थेत आहे का? तालुक्यातील साडेसहाशे लोकसंख्या असलेल्या व रसलपुर ग्रामपंचायत हद्दीमध्ये येणाऱ्या राजुरा बुद्रुक गावाला दळणवळणासाठी रस्ता सुद्धा उपलब्ध नाही. भारत स्वातंत्र्य होऊन ७५ वर्षे उलटले तरी रस्त्याची समस्या अद्याप कायम आहे, त्यामुळे लोकप्रतिनिधी नेमके करतात काय?असा प्रश्न उपस्थित झाला आहे. राजुरा बुद्रुक हे गाव राजुरा लघु प्रकल्पाला लागूनच वसलेले आहे.येथील लोकसंख्या जवळपास ६५० च्या आसपास आहे. या गावाला पंचायत समिती जळगाव जामोद अंतर्गत निधी मिळत असून त्या निधीचा पुरेपूर वापर ठेकेदार करीत असून हे गाव विकासापासून कोसो दूर आहे. या गावाला दळणवळणा करीता अद्याप रस्ता उपलब्ध नाही.त्यामुळे येथील ग्रामस्थांचे मोठ्या प्रमाणात हाल होत आहेत. रस्ता बैल गाडीच्या चाकोरीचा असल्याकारणाने या रस्त्यावर मोठ-मोठी डबकी साचली आहेत. चिखल तुडवत शाळेतील विद्यार्थी व ग्रामस्थांना तालुक्याच्या ठिकाणी जावे लागते. त्यामुळे या गावकऱ्यांनी शासनाला दर्जेदार रस्त्याची मागणी केली आहे. राजुरा बुद्रुक येथील जिल्हा परिषदेची शाळा असून शाळेला रीतसर बोर्ड सुद्धा लावलेला नाही. शाळेचा परिसर सुद्धा अस्वच्छ व चिखलमय झालेला असून येथील विद्यार्थ्यांना जाण्या येण्यास मोठ्या प्रमाणात त्रास होत आहे.याशिवाय इतरही मूलभूत सुविधांचा अभाव असल्याने संबंधित प्रशासनाने व लोकप्रतिनिधींनी याकडे लक्ष देऊन समस्या सोडविण्यासाठी पुढाकार घेण्याची गरज आहे. अशी मागणी येथील ग्रामस्थ रमेश जमरा, रामलाल बंडल, रमेश वेरसिंग बोंडल,मुरली जमरा, संजय भेलसिंग बोंडल, मारोती मिसाळ, विनोद कनाशा,पुनमसिंग बोंडल, सुनिल चंगळ,आशिराम बोंडल,गिलदार बोंडल यांनी केली आहे.

दैनिक निडर निर्भिड जनसंचलन व्यापक जनचळवळीचा प्रहरी!
आपल्या परिसरातील घडणाऱ्या घटना व बातम्या ९८२२७२०७८४ किंवा ९१२९५८२९५८ या व्हाट्सअप्प नंबर वर पाठवून आम्हाला सहकार्य करावे

दैनिक निडर निर्भिड जनसंचलन व्यापक जनचळवळीचा प्रहरी!
===== बातम्या तसेच जाहिरातीसाठी संपर्क =====
संपादक - जितेंद्र कायस्थ ९८२२७२०७८४ ऑफिस :- ९१२९५८२९५८